# WEB PORTAL developed by ABM in integration with HDFC, 10th March 2017

Inauguration of WEB PORTAL developed by ABM Knowledgeware Ltd. in integration with HDFC for SHRIGONDA Municipal Council in Ahmednagar District.



## कॅशलेस प्रणाली, वेबसाइटचे लोकार्पण

श्रीगोंदे : श्रीगोंदा नगरपरिषदेने नागरिकांच्या सेवेसाठी सुरू केलेल्या कॅशलेस प्रणालीचा व संकेतस्थळाचा उपयोग नागरिकांनी करून घेण्याचे आवाहन नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी केले.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, उपाध्यक्ष अर्चना गोरे, माजी नगराध्यक्षा छाया गोरे, एच.डी.एफ.सी. बँकेचे व्यवस्थापक नीलेश भावसार व नगरसेवक यांच्या उपस्थितीत श्रीगोंदा नगरपरिषदेच्या वतीने कॅशलेस प्रणाली व संकेतस्थळाचा लोकार्पण सोहळा नगराध्यक्ष मनोहर पोटे यांच्या हस्ते पार पडला. श्रीगोंदा नगरपरिषदेच्या www. shrigondanagarparishad.in या संकेतस्थळावरून आता नागरिकांना घरबसल्या नगरपालिकेच्या कारच्या रकमा ऑनलाइन भरता येणार आहेत. तसेच कोणत्याही बँकेच्या कार्डवरून कराची रक्कम घेण्याच सुविधा उपलब्ध झाली आहे. नगरपालिकेच्या संकेतस्थळावरून जन्म, मृत्यू नोंद, सरकारस्तरावरील बदल, नगरपालिकेची माहिती उपलब्ध होणार असल्याचे नगराध्यक्ष पोटे यांनी सांगून ए. बी. एम. नॉलेजवेअर या संस्था व प्रकल्प समन्वयक सतीश रोकडे यांनी ही प्रणाली सुरू केल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले.






दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
divyamarathi.com
१४ राज्ये | ६२ आवृत्त्या

# कॅशलेस व संकेतस्थळाचा वापर करा : पोटे

प्रतिनिधी | श्रीगोंदे

नगरपरिषदेने नागरिकांच्या सेवेसाठी सुरू केलेल्या कॅशलेस प्रणालीचा व संकेतस्थळाचा उपयोग नागरिकांनी करावा, असे आवाहन नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी केले.

पालिकेतर्फे कॅशलेस प्रणाली व संकेत स्थळाचे लोकार्पण नगराध्यक्ष पोटे यांचे हस्ते झाला. यावेळी पोटे बोलत होते. मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, उपाध्यक्ष अर्चना गोरे, माजी नगराध्यक्षा छाया गोरे, एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापक नीलेश भावसार उपस्थित होते.

पोटे म्हणाले, पालिकेच्या www.shrigondanagarparishad.in या संकेतस्थळावरून नागरिकांना घरबसल्या पालिकेच्या कराच्या रकमा ऑनलाइन भरता येतील. संकेतस्थळावरून जन्म, मृत्यू नोंद, शासन स्तरावरील बदल याची माहिती मिळेल.